# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर.

-: **प्रसिध्दीपत्रक** :-

विषय :- सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत जनरेटर
व युपीएस, तसेच सुटे भाग बदलणे-
देखभाल, दुरुस्ती वार्षिक दरकरार बाबत.

---**---

पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर आस्थापनेवरील सात पोलीस ठाणे व वरिष्ठ कार्यालय येथे सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत उपलब्ध असलेले जनरेटर व युपीएस, तसेच सुटे भाग बदलणे- देखभाल दुरुस्ती करीता वार्षिक दर करार (Annual Maintainence Contract) करणेसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत उपलब्ध असलेले जनरेटर व युपीएस, तसेच सुटे भाग बदलणे संदर्भात देखभाल दुरुस्ती करीता **प्रतिनग सर्व करासह दर नमुद करुन** सदर सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.
सदर बाबत खालील अटी व शर्तीचे लागू राहणार आहेत.

**(अ) जनरेटर** :-

| अ.क्र. | तपशिल | प्रति नग | दर रुपये |
|---|---|---|---|
| 1 | ऑईल चेंज 370 प्रति लिटर | 3 लिटर | |
| 2 | ऑईल फिल्टर | 1 नग | |
| 3 | डिझेल फिल्टर | 1 नग | |
| 4 | तपासणी मासिक चार्जेस | - | |
| * | **मेन्टेनन्स करीता लागणारे पार्ट दर** | - | |
| 1 | इग्नेशन स्वीज | प्रति नग दर | |
| 2 | स्टार्टर | प्रति नग दर | |
| 3 | अल्टरनेट | प्रति नग दर | |
| 4 | वायरींग किट | प्रति नग दर | |
| 5 | डिस्प्ले | प्रति नग दर | |
| 6 | टेम्परेचर मिटर | प्रति नग दर | |
| 7 | आरपीएम मिटर | प्रति नग दर | |
| 8 | नौजल | प्रति नग दर | |
| 9 | बॉस पंप | प्रति नग दर | |
| 10 | फ्युल टँक | प्रति नग दर | |
| 11 | फ्युल टँक फिल्टर | प्रति नग दर | |
| 12 | ॲटो ऑन ऑफ स्विच | प्रति नग दर | |
| 13 | फ्युअल टँक फ्लशिंग | प्रति नग दर | |
| 14 | 12/36 बॅटरी 18 महिने वॉरंटी | प्रति नग दर | |
| 15 | बॅटरी चार्जर | प्रति नग दर | |

**(ब) युपीएस** :-

| अ.क्र. | तपशिल | प्रति नग | दर रुपये |
|---|---|---|---|
| 1 | युपीएस पीसीपी बोर्ड | प्रति नग दर | |
| 2 | चार्जींग कार्ड | प्रति नग दर | |
| 3 | बॅटरी 12/26 | प्रति नग दर | |
| 4 | बॅटरी 12/27 | प्रति नग दर | |
| 5 | सर्व्हिसिंग चार्जेस मासिक 300 प्रमाणे | प्रति महा | |

मासिक तपासणी चार्जेस प्रति जनरेटर व युपीएस या उपकरणाची बिले ही नियमितपणे मंजूरीकरीता सादर करणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त खराब झालेला पार्टस् बदलावयाचा असल्यास प्रथम या कार्यालयाची लेखी मंजूरी घ्यावी लागणार आहे. त्यानंतरच दरपत्रकामध्ये नमुद स्विकृत दराने तो पार्ट बदलावा लागणार आहे.

सदर बाबत खालील अटी व शर्तीचे लागू राहणार आहेत.

| | |
|---|---|
| 1. | सदर सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत जनरेटर व युपीएस, तसेच सुटे भाग बदलणे- देखभाल, दुरुस्ती वार्षिक दरकरार हा पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाकरीता असणार आहे. |
| 2. | या कार्यालयास न्युनतम दराची निविदा मान्य करण्याचे बंधन असणार नाही. कार्यालयाच्या कामकाजाच्या हितासाठी अन्य यथोचित निविदा मंजूर करण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहेत. |
| 3. | सदर कामाचे ठिकाणी जाण्याचा, येण्याचा व इतर कुठल्याही प्रकारचा खर्चाची जबाबदारी निविदाधारकाची राहील. |
| 4. | निविदेमधील सर्व काम हे कामाचे तुकडे करुन काम वेगवेगळया निविदाकारांना देण्यात येणार नाही. एकाच पात्र निविदाधारकास आवश्यकता वाटल्यास दरपत्रकातील दराच्या वाटाघाटीस अनुसरुन एकवट पध्दतीने देण्यात येईल. |
| 5. | या निविदेतील कोणती ही अट रद्द करण्याचा / शिथील करण्याचा किंवा संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्याचा अथवा पुढे ढकलण्याचा संपूर्ण अधिकार पोलीस आयुक्त सोलापूर शहर यांनी राखून ठेवला आहे. |
| 6. | दुकानाचे नोंदणी प्रमाणपत्र / पॅनकार्ड / जीएसटी प्रमाणपत्र / आधारकार्ड जोडणे आवश्यक आहे. |
| 7. | काळया यादीत असणारे व्यापारी यांनी दरपत्रके सादर करु नयेत. |
| 8. | गुन्हे दाखल असणारे व्यापारी यांनी दरपत्रके सादर करु नयेत. |
| 9. | दरपत्रकामध्ये करासहित सर्व खर्चाचा समावेश असावा. |
| 10. | जनरेटर व युपीएस, तसेच सुटे भाग बदलणे, त्याचप्रमाणे उपलब्ध जनरेटर व युपीएस संदर्भात दुरुस्ती देखभाल या कामाची पुर्तता झाल्या नंतर तसेच शासकीय अनुदान प्राप्त झाल्यानंतर देयक अदा करण्यात येईल. |
| 11. | सदरचे बिल अदा करताना नियमाप्रमाणे टी.डी.एस. कपात केला जाईल. |
| 12. | वार्षिक देखभाल करार चे देयक कामाची पुर्तता होताच तात्काळ संबंधीत पोलीस ठाणे / शाखा या कार्यालयाचे प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने तीन प्रतीत या कार्यालयास सादर करतील. |
| 13. | परंतु एखाद्या महिन्यात अनुदान उपलब्ध न झाल्यास सदर बिलावरती कोणतेही व्याज मागता येणार नाही. |
| 14. | उपलब्ध जनरेटर व युपीएस पैकी बहुतांश नमुद उपकरणाची वॉरंटी कालावधी संपलेला आहे. |
| 15. | मंजूर कंत्राटदाराने नियमित देखभाल दुरुस्ती बरोबरच कोणत्याही वेळी जनरेटर व युपीएस नादुरुस्त झाल्याचे कळविल्यास तातडीने दुरुस्तीसाठी हजर राहणे बंधनकारक आहे. |
| 16. | जनरेटर व युपीएस दुरुस्ती / नवीन जोडणी करणे ही कामेही करणे बंधनकारक आहे. |
| 17. | दरपत्रकात नमुद उच्च दर्जाचेच साहित्य पुरवठा करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. |
| 18. | दरपत्रकात नमुद दर मंजुर झालेनंतर कंत्राटदाराला प्रत्येक जनरेटर व युपीएस करीता History Sheet ठेवणे बंधनकारक राहील. नियमित देखभाल दुरुस्ती व केलेल्या दुरुस्ती कामांची नोंद सदर History Sheet मध्ये घेऊन त्यावर संबंधीत पोलीस अंमलदार यांची स्वाक्षरी घेऊन History Sheet च्या झेरॉक्स प्रतीसह पोलीस ठाणे / शाखा / विभाग निहाय बिले सादर करणे बंधनकारक राहील. |
| 19. | स्विकृत पुरवठादाराने दराबाबत व कामकाजाबाबत पोलीस आयुक्त कार्यालय, सोलापुर शहर यांचे बरोबर रु.100/- स्टॅम्प पेपरवर नोटरीद्वारे करार करणे आणि सदर कराराचा खर्च हा संबंधीत कंत्राटदाराने करणे बंधनकारक आहे. |
| 20. | सिलबंद दरपत्रकावर विषय :- सीसीटीएनएस प्रकल्पांतर्गत जनरेटर व युपीएस, तसेच सुटे भाग बदलणे- देखभाल, दुरुस्ती वार्षिक दरकरार बाबत. असा नमुद करणे. |
| 21. | तसेच प्रति, मा.पोलीस आयुक्त सोलापूर शहर असे नांव व संबंधीत फर्मचे नांव डाव्या बाजूस खाली एका कोपऱ्यात असावे. |
| 22. | नमुद कामाची सिलबंद दरपत्रके ही संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द केलेल्या दिनांकापासून 07 दिवसात या कार्यालयात बारनिशी विभाग येथे सादर करावीत. |

**मा.पोलीस आयुक्त**
**यांचे मान्यतेने.**

( अजित बो-हाडे )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त सोलापूर शहर
यांचे करीता.